agriculture I-AGRI is my passion
Powered by KRISHITHON

# संवाद युवकांचा निश्चय प्रगतीचा

## युवा कृषी सन्मान व संवाद

### प्रयोगशील युवा कृषी सन्मान व संमेलन

23 - 27 नोव्हें 2023

स्थळ : कृषीथॉन, ठक्कर डोम, एबीबी सर्कल जवळ, नाशिक.

- पुरस्कर्ता -
Krishithon® कृषीथॉन

- आयोजक -
HSF Human Service Foundation
A Regd. Trust
MEDIA® EXHIBITORS PVT. LTD.

- संकल्पना -
YOUTH IN AGRICULTURE

# युवकांचे कृषि क्षेत्रातील महत्व अधोरेखीत करणारा उपक्रम !



**पद्मविभुषण मा. शरद पवार**
माजी कृषी मंत्री, भारत सरकार



**मा. राजेंद्र सिंह – जलपुरुष**
मॅगेसेस अॅवॉर्ड विजेता



**मा. ज्ञानेश्वर बोडके**
अभिनव फार्मस् क्लब



**पद्मश्री मा. सुभाष पाळेकर – प्रवर्तक, झीरो बजेट नॅचरल फार्मिंग**

## प्रयोगशील युवा कृषी सन्मान व संमेलन : २०२३

भारतीय कृषी क्षेत्रास सातत्याने वेग–वेगळ्या गंभीर समस्या भेडसावित आहेत. बदलत्या हवामानासोबत मानव निर्मित समस्यांचा देखील विळखा या क्षेत्रास पडला आहे. एका बाजूस वाढत्या जनसंख्येस अन्न पुरविण्याचे आव्हान आणि दुसऱ्या बाजूस शेतकऱ्यांना उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा भाव यातील तफावत यामुळे ग्रामीण भागातील युवक शेती व्यवसाय सोडून शहराकडे स्थलांतरित होत आहे. अशा समयी गरज आहे ती कृषी क्षेत्रात कार्यरत असलेले शेतकरी, कृषी संशोधक, उद्योजक आणि कृषी विभागात विस्ताराचे कार्य करणाऱ्या प्रयोगशील युवकांच्या माध्यमातून या समस्यांवर उत्तर शोधण्याची आणि त्यांच्या कार्याच्या गौरवाची.

कृषीथॉन या प्रदर्शनाच्या माध्यमातून सन १९९८ पासून युवकांचा शेतीतील सहभाग या विषयावर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. या माध्यमातून विचारांच्या देवाण – घेवाणासोबत नवनवीन तंत्रज्ञानासोबत युवक जोडला गेला आहे. याची प्रचिती नाशिक जिल्ह्यातील कृषी क्षेत्राचा विकास इतर जिल्ह्याच्या तुलनेत बघितल्यावर लक्षात येते, याचे मुख्य श्रेय जाते ते युवकांनी तंत्रज्ञान आत्मसात करून त्याचा वापर केल्याच्या कार्यास.

### बदल घडविणारे व्यासपीठ

महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातून ३५० युवा जे कृषी क्षेत्रात कार्यरत आहेत. शेतकरी, शास्त्रज्ञ आणि कृषी उद्योजक. ज्यांनी 'कृषी विकासाचे ध्येय' गाठण्याचे स्वप्न उराशी बाळगले आहे. अशा युवकांच्या विचारांची देवाण – घेवाण.

### कृषी क्षेत्रातील कार्यसम्राटांकडून मार्गदर्शन

आपल्या कार्याने ज्यांनी कृषी क्षेत्रास नवीन संकल्पना, कृषी क्षेत्राचे संवर्धन किंवा ग्रामिण भागात रोजगार निर्मिती करवून दिली. अशा प्रतिभावंत कार्य सम्राटांद्वारे मार्गदर्शन व शंका निराकरण.

# आमच्या कौशल्याने बहरेल कृषिक्षेत्राचे रूप !











कृषीथॉन युवा सन्मान दरम्यान आपले विचार व्यक्त करतांना युवा.



## कार्याचा गौरव

संमेलनात सहभागी झालेल्या प्रयोगशील युवकांच्या कार्याचा गौरव. यात खालील श्रेणीत कार्यरत असलेल्या युवकांची निवड करण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| **प्रयोगशील युवा शेतकरी** पुरुष / महिला | **प्रयोगशील युवा कृषी संशोधक** | **प्रयोगशील युवा कृषी उद्योजक** | **प्रयोगशील गुणवंत कृषी विद्यार्थी** |

## कृषी तंत्रज्ञान विस्तार कार्यात प्रयोगशीलता दर्शविणारे खालील श्रेणीतील युवा

| | | | |
|---|---|---|---|
| **कृषी विभाग** | **सामाजिक संस्था** | **कृषी विद्यापीठ** | **कृषी विज्ञान केंद्र** |

## कृषीथॉन युवा सन्मान पुरस्कारासाठी पात्रता

१) अर्जदार हा भारतीय नागरिक असावा.
२) अर्जदार २५ ते ३५ या वयोगटातील असावा.
३) अर्जदाराने पुरस्कारासाठी असलेल्या फॉर्ममध्ये संपुर्ण माहिती भरून देणे अनिवार्य आहे. अपूर्ण माहिती असल्यास प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाहीत.

▸ नामांकनासाठी अंतिम दि. ३० सप्टेंबर २०२३

## आयोजक : ह्युमन सर्व्हिस फाऊंडेशन, नाशिक

ह्युमन सर्व्हिस फाउंडेशन सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी संस्था असून, सन १९९८ पासून समाजातील विविध घटकांना एकाच उद्देशाने एकत्रित आणून कृषी, सामाजिक स्वास्थ्य, बाल व महिला हक्क यांसारख्या विविध विषयांवर कार्य करीत आहे. संस्थेतर्फे भरविले जाणारे 'कृषीथॉन' हे आंतरराष्ट्रीय कृषी प्रदर्शन असंख्य शेतकरी, कृषी व्यावसायिक, कृषी संशोधक आणि अभ्यासकांसह कृषी क्षेत्राशी निगडित नागरिकांचे हक्काचे व्यासपीठ बनले आहे. या प्रदर्शनात आयोजित परिसंवाद, चर्चा सत्र, कार्यशाळा हे उपक्रम शेतकरी आणि कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्ये नवसृजनाची बीजे रोवून त्यांना प्रेरित करीत आहेत. ह्युमन सर्व्हिस फाउंडेशन गेल्या अनेक वर्षांपासून शेतीत करिअर करू इच्छिणाऱ्या युवकांना मार्गदर्शन करून त्यांना करिअरच्या संधी देखील उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात अनेकांसाठी ह्युमन सर्व्हिस फाउंडेशन प्रेरणास्रोत म्हणून पुढे आले आहे.

# कृषी विकासासाठी कटीबध्द - चला करूया कृषी समृध्द !



**मा.श्री. एकनाथ डवले**
ग्रामविकास व पंचायतराज विभाग, महाराष्ट्र राज्य



**पद्मश्री. राही बाई पोपरे** - बीज माता आणि
**श्री सूरज मांढरे** - आयएएस




**मा.श्री. विश्वास नांगरे पाटील**
पोलिस आयुक्त, नाशिक.



**मा.श्री. मकरंद अनासपुरे**
अभिनेते आणि सामाजिक कार्यकर्ते





**साहील न्याहारकर**
आयोजक - कृषीथॉन

## आयोजक शहर : नाशिक

नाशिक शहरात कृषीथॉनच्या माध्यमातून युवा सन्मान व संमेलनाचे आयोजन करतांना अभिमान वाटत आहे. नाशिक शहराभोवती वसलेले सह्याद्री डोंगरांचे निसर्ग सौंदर्य, सुखकारक व आल्हाददायक हवामान हे शहराच्या सौंदर्यात अधिकच भर घालते. महाराष्ट्रातील या जिल्ह्याने कृषी क्षेत्राशी निगडित आपले विशेष योगदान दिले आहे. या योगदानाच्या बळावर नाशिक शहर आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला विशेष ठसा उमटविण्यात यशस्वी होतांना दिसत आहे. नाशिक परिसरात वेगवेगळ्या प्रकारच्या पिकांचे उत्पादन घेतले जाते व ही भूमी कृषी क्षेत्रातील भरीव योगदानाची कर्मभूमी म्हणूनही आपले नाव जगभरात अधोरेखित करीत आहे. संपूर्ण भारतातून नाशिक जिल्ह्याचा कृषी योगदानात प्रथम क्रमांक लागतो. नाशिकमध्ये उत्कृष्ठ दर्जाची द्राक्षे, कांदा व डाळिंबाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. या फळांसाठी नाशिकला निर्यातदार म्हणून सुध्दा ओळखले जाते. त्याच प्रमाणे ताजा भाजीपाला सुध्दा येथे विपुल प्रमाणात तयार होतो. याशिवाय नाशिकमधून संपूर्ण भारतभर सहज वाहतूक होते हे विशेष.

Krishithon®
कृषीथॉन

**भारतातील अग्रगण्य कृषी प्रदर्शन**
**23rd - 27th नोव्हें. 2023**
**नाशिक, महाराष्ट्र, भारत**

**नामांकन अर्ज आणि नोंदणी विषयी अधिक माहितीसाठी संपर्क करा.**
**निखिल - पुरस्कार समन्वयक, मो.नं. 9175094569**

**सूचना :** तुम्ही नामांकनासाठी अर्ज पाठविला म्हणजे तुमची अंतिम निवड झाली असे नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

HSF Human Service Foundation
A Regd. Trust

MEDIA® EXHIBITORS PVT. LTD.

**मिडीया हाऊस** - आनंदी नगर, आनंदवल्ली जवळ, गंगापूर रोड, नाशिक, महाराष्ट्र, भारत - ४२२००१३ | ई मेल : krishi.nashik@gmail.com

Human Service Foundation
A Regd. Trust

agriculture I-AGRI is my passion Powered by KRISHITHON

Krishithon™
कृषीथॉन

# युवा सन्मान 2023

कृपया येथे पासपोर्ट साईज रंगीत फोटो चिकटवा.

## पुरस्काराचे नांव – युवा कृषी संशोधक पुरस्कार

पुरस्कार उद्दिष्ट्ये : कृषी आणि संबंधित क्षेत्रामध्ये संशोधन कार्यक्रमात सहभागी होऊन विलक्षण कल्पकता आणि समर्पकता दाखविणाऱ्या प्रतिभावान शास्त्रज्ञांचा शोध घेऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करणे.

पात्रता निकष : कृषी संशोधन क्षेत्रात डॉक्टरेट पदवी मिळवलेले व मिळवत असलेले वय वर्ष पस्तीसच्या आतील तरूण शास्त्रज्ञ या पुरूस्काराकरीता आपले प्रस्ताव पाठवू शकतात. जे किमान तीन वर्षे संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत.

मुल्यांकन निकष : युवा कृषी संशोधक पुरस्कार केवळ वैयक्तिक पातळीवर दिले जाणार आहेत. अर्जदाराची कृषी आणि संबंधीत कोणत्याही शाखेतील केलेल्या मागील संशोधन कार्य आधारावर निवड केली जाईल. महाराष्ट्रातील संशोधन संस्था किंवा विद्यापीठात संशोधन करणाऱ्यांना हा पुरस्कार विभागीय पातळीवर दिला जाईल.

---

अर्जाच्या नमुन्यामध्ये दिलेल्या माहितीनुसार आपले प्रस्ताव खालील पत्त्यावर किंवा दिलेल्या ईमेल आयडी वर पाठवावेत.

**ह्युमन सर्व्हीस फाऊंडेशन -** मिडीया हाऊस, आनंदी नगर, वृंदावन लॉन्स समोर, गंगापूर रोड, नाशिक – ४२२ ०१३. ई-मेल : crm@mediaexhibitors.com

---

**संशोधनाचे निवडलेले क्षेत्र** : पीक / फलोत्पादन विज्ञान / नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन / कृषी अभियांत्रिकी / पशु आणि मत्स्य व्यवसाय विज्ञान / सामाजिक विज्ञान

संपूर्ण नांव : ______________________

जन्म तारीख : ______________________

संपूर्ण पत्ता : ______________________

फोन नं. : ______________ मोबाईल नं.: ______________

ई-मेल : ______________________

**शैक्षणिक अर्हता** : (एक तक्त्याच्या स्वरूपात पहिल्या पदवीसह किंवा समांतर पदवीपर्यंत नमूद करावे.)

| अ.क्र. | पदवी | विद्यापीठ / संस्था | वर्ष |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

**केलेल्या कामाचा तपशील** : (एक तक्त्याच्या स्वरूपात नमूद करावे.)

| अ.क्र. | संस्था / कंपनीचे नाव | हुद्दा | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**कृषी संशोधनातील योगदान** : (विस्तृत तपशील जोडावा.)

- कधी, कुठे आणि कशा प्रकारे संशोधन कार्य आयोजित करण्यात आले ?
- संशोधन प्रकल्पातील / कामातील सामाजिक-आर्थिक, वैज्ञानिक आणि तांत्रिक संबंधातील प्राधान्य कशाला होते ?
- संशोधनातील मुख्य निष्कर्ष आणि त्याचे सामाजिक व आर्थिक, वैज्ञानिक, तांत्रिक महत्व काय ?
- संशोधनातील योगदानाचा परिणाम.

(टिप : कृपया संबंधीत प्रशस्तीपत्रे, छायाचित्रे, व्हीडीओ, वृत्तपत्राची कात्रणे इत्यादी प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.)

अर्जदाराची स्वाक्षरी

Human Service Foundation
A Regd. Trust

I-AGRI agriculture is my passion Powered by KRISHITHON

Krishithon कृषीथॉन

# YUVA SANMAN 2023

## Outstanding Young **Scientist Awards**

**Name of the Award :** KRISHITHON – YUVA SANMAN - Outstanding Young Scientist Award

**Objectives of the Award :** To recognize the talented young scientists who have shown extraordinary originality and dedication in their research programmes in Agriculture and allied sector.

**Eligibility Criteria :** All young scientists who possess a doctoral degree or perusing doctoral and are below thirty-five years of age. Candidate should be engaged in research areas for at least three years continuously are eligible for consideration.

**Evaluation Criteria :** The Young Scientist Award is exclusively meant for individual scientist. The candidates will be judged on the basis of previous research work done in any discipline of agriculture and allied sciences. These awards will be given on division level of Maharashtra like – Nashik Division, Pune Division, Kokan Division, Aurangabad Division, Amravati Division & Nagpur Division. Each division will have one awardee.

Please Paste Passport Size Photograph

## APPLICATION FORM

Please complete the form and return it to: **Human Service Foundation,** MEDIA HOUSE, Opp. Vrundavan Lawns, Anandi Nagar, Anandwali, Gangapur Road, Nashik – 422013 Email.: crm@mediaexhibitors.com

- Discipline in which applied – Crop & Horticultural Sciences / Natural Resource Management / Agricultural Engineering / Animal & Fisheries Sciences / Social Sciences
- Name and designation of the scientist in full (underline surname) : ______
- Father's / Husband's Name : ______
- Date and place of birth : ______ • Marital status : ______
- Postal and telecommunication address : ______
- Name of Research Institute / Organisation : ______
- Address of Research Institute / Organisation : ______
- Tele. : ______ • Mobile : ______
- Email : ______

Educational qualifications beginning with the first-degree or Equivalent (in a tabular form)

| S.No. | Degree | Institution | Year |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

**Employment record** (in tabular form)

| S.No. | Name of Employer | Designation | From | To |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**Details of the Research contributions** (Attach Seprate Sheet, Submit Photographs, Videos, Newspaper Cuttings)

- When, where, and how the research work was conducted?
- What was the socio-economic, scientific and technological relevance and priority of the research project.
- What were the principal findings and their socio-economic, scientific, technological significance?
- Impact of research contributions.

**Briefly Describe :-**

- **What do you consider to be the biggest challenges faced by the agricultural industry and how will you ensure that your business can survive them?**

  (If Applicant wish to submit any audio video presentation he / she may submit for better understanding)

**Signature of Institute Head** **Signature of Applicant**